# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): कोल्हापुर **P.S.**(ठाणे): कागल **Year** (वर्ष): 2021

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0040 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 09/02/2021 00:44 बजे

2.

| **S.No.** (अ.क्र.) | **Acts** (अधिनियम) | **Sections** (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): सोमवार
**Time Period** (कालावधी): पहर 6
**Date From** (दिनांक पासून): 08/02/2021
**Date To** ( दिनांक पर्यंत): 08/02/2021
**Time From** (वेळेपासून): 17:21 बजे
**Time To** (वेळेपर्यंत): 18:08 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
**Date** (दिनांक ): 09/02/2021 **Time** (वेळ): 00:44 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ
**Entry No.** (नोंद क्र.): 003 **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 09/02/2021 00:44 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): पश्चिम, 1 किमी
**Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): मध्यवर्ती प्रषासकीय इमारत, काग, कागल

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):
**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): महादेव कशणा चैगले

(b) **Father's Name** (वडील चे नाव) : कशणा चैगले

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1964 (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.**(अ. | **Id Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **Id Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | प्लॉट नं264/अ, फिल्टर हाऊसजव, कागल ,कागल,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | प्लॉट नं264/अ, फिल्टर हाऊसजव, कागल जयसिंगराव पार्क, कागल,कागल,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.): 91-9423043145**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | मिलींद मधुकर कुलकर्णी | | वडील का नाम : मधुकर कुलकर्णी | 1. प्लॉट नं 69, अरूणोदय को , सोसायटी, शाहु पार्क, राजेंद्रन,कागल, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रुपये दराच्या 4 चलणी नोटा | 2,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 2,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी महादेव कृशणा चैगले वय-57, व्यवसाय-नोकरी, औशध निर्माण अधिकारी, नेम.ग्रामीण रूग्णालय मुरगूड रा.प्लाट नं.264/अ, फिल्टर हाऊसजवळ, जयसिंगराव पार्क, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर, मो.नं. 9423043145, आज रोजी समक्ष पोलीस ठाणेत हजर राहून फिर्याद देतो की, मी वरील गावचा रहिवाषी असुन गावी मी माझे कुटूंबीयांसह एकत्रीत राहणेस आहे. माझी दि.08/02/1985 रोजी औशध निर्माण अधिकारी म्हणून निवड झालेनंतर मी ग्रामीण रूग्णालय जत याठिकाणी नोकरीस होतो. त्यानंतर सध्या मी दि.09/06/2012 पासून औशध निर्माण अधिकारी म्हणून ग्रामीण रूग्णालय, मुरगूड येथे कार्यरत आहे.मी ग्रामीण रूग्णालय, मुरगूड येथे वैदयकीय अधीक्षक, ग्रामीण रूग्णालय मुरगूड यांचे आदेषानुसार औशध पुरवठयाचे काम करीत आहे. मी आमच्या रूग्णालयाकरीता औशधांची मागणी कार्यालयीन मंजुरीनंतर प्रत्येक महिन्याच्या 07 तारखेला ग्रामीण रूग्णालय, नियंत्रण कक्ष, सीपीआर आवार, कोल्हापूर येथे सादर करीत असतो. त्यामध्ये जी औशधे ग्रामीण रूग्णालय, नियंत्रण कक्ष, सीपीआर आवार, कोल्हापूर येथून मिळत नाहीत त्या औशधाची आवष्यक स्थानिक खरेदी वैदयकीय अधीक्षक, मुरगूड यांचे सल्यानुसार घेवुन त्यांची बिले बनवित असतो. त्यानंतर सदरची बिले रूग्णालयातील क्लार्क आवष्यक ती पुर्तता करून उप कोशागर कार्यालय, कागल येथे पाठवित असतात.मी माहे जून पासून कोरोना व इतर आजारावरची औशधे व ऑक्सीजन खरेदी केलेली एकूण चार स्थानिक औशधाची बिले आवष्यक ती कागदपत्रांची पुर्तता करून कार्यालयातील कनिश्ठ क्लार्क श्री डोणोलीकर यांचेकडे जमा केली होती. त्यानंतर श्री डोणोलीकर यांनी आवष्यक कागदपत्रांची पुर्तता करून उप कोशागर कार्यालय, कागल येथे जमा केली होती. उप कोशागर अधिकारी श्री कुलकर्णी यांनी सदर बिलाची तपासणी करून मला श्री डोणोलीकर यांचेमार्फत कोशागर ऑफीस, कागल येथे समक्ष भेटणेसाठी बोलविले. त्यानंतर मी दि. 01/02/2021 रोजी उप कोशागर अधिकारी श्री कुलकर्णी यांची भेट घेण्यासाठी गेलो. तेथे त्यांनी चारही आवष्यक स्थानिक औशध बिलामध्ये आक्षेप घेवुन सर्व बिलांची त्रुटी पुर्तता योग्य त्या प्रमाणपत्रासह देणेस सांगून माझेकडे 2000/- रुपये लाचेची मागणी केली.श्री कुलकर्णी हे माझेकडे मागत असलेले 2000/-रूपये हे लाच म्हणूनच मागत असलेची माझी खात्री झाली आहे. परंतू त्यांना लाच देणेची माझी इच्छा नसलेने मी दि. 03/02/2021 रोजी अँन्टी करप्षन ब्युरो, कोल्हापूर येथे जावुन पोलीस उपअधीक्षक श्री बुधवंत साहेबांची भेट घेवुन माझी वरीलप्रमाणे थोडक्यात तक्रार सांगुन त्यांचेकडे माझा लेखी तक्रारी अर्ज दिला. त्यावेळी मी बुधवंत साहेबांना आवष्यक स्थानिक बिलाची त्रुटी पुर्तता करून दि.08/02/2021 रोजी उप कोशागर अधिकारी श्री कुलकर्णी यांना भेटणार असल्याचे सांगितले. मी साधारण दुपारी 14.30 वा.चे सुमारास श्री बुधवंत साहेबांना फोन करून चर्चा केली असता चर्चेअंती त्यांनी मला जयसिंगराव तलाव, कागल येथे येण्यास सांगितले. त्यानंतर मी लागलीच जयसिंगराव तलाव, कागल याठिकाणी गेलो असता तेथे षासकीय टाटा सुमोसह येवुन थांबलेले पोलीस उपअधीक्षक श्री.

बुधवंत साहेब यांची भेट घेतली. त्यावेळी त्यांनी मी दि.03/02/2021 रोजी उप कोशागर अधिकारी श्री कुलकर्णी यांचे लाच मागणीचे अनुषंगाने त्यांचेविरुध्द कारवाई होणेकरीता माझा दिलेला तक्रारी अर्ज आपले हातात घेतला व माझी तक्रार पंचांना सांगणेची सुचना दिली. त्याप्रमाणे मी माझी तक्रार पंचांना सांगितली. त्यानंतर श्री.बुधवंत साहेबांनी माझी लेखी तक्रार पंचांना वाचावण्यास दिली. मी सांगितलेली तोंडी तक्रार व लेखी तक्रार एकच असलेची पंचांची खात्री झाली. त्यानंतर श्री.बुधवंत साहेबांचे सुचनेनुसार दोन्ही पंचांनी माझे लेखी तक्रारीखाली सह्या केल्या. तसेच बुधवंत साहेबांनी देखील तक्रारी खाली सही केली.श्री.बुधवंत साहेबांनी मला व दोन्ही पंचांना उप कोशागर कार्यालय, कागल येथील श्री कुलकर्णी हे माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याबाबत प्रथम पडताळणी करणार आहोत असे सांगितले. तसेच पडताळणीकरीता मी श्री कुलकर्णी यांना भेटणेस जाताना माझेसोबत पंच श्री.कांबळे यांना पाठवणार असल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांनी शासकीय वाहनामध्येच त्यांचे कार्यालयाकडील डिजीटल व्हाईस रेकार्डर काढून त्यामध्ये नवीन सनडिस्क कंपनीचे 8 जीबीचे मायक्रो एसडी कार्ड घालून त्यामध्ये पुर्वीचे कोणत्याही प्रकारचे संभाशण ध्वनिमुद्रीत नसल्याची खात्री करून दिली. मला व पंच श्री.कांबळे यांना पडताळणी कारवाईबाबत योग्य त्या सुचना दिल्या. त्यांनतर बुधवंत साहेबांनी शासकीय गाडीत मध्ये त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 17.21 वा.चालू करुन तो माझे गळयात अंगावरील शर्टचे आतील बाजुस अडकवून दिला व मला आणि पंच श्री.कांबळे यांना माझेकडील स्कूटर सुझुकी अक्सेस नंबर-डभ्.09ध्म्क्. 3419 यावरुन उप कोशागर कार्यालयमध्ये श्री कुलकर्णी यांची भेट घेणेकरीता पाठविले. तेथे जावुन मी श्री कुलकर्णी यांची भेट घेतली, तेव्हा श्री कुलकर्णी यांना मी आवष्यक स्थानिक बिले व ऑक्सीजन बिलामध्ये असलेली आक्षेपांची पुर्तता केलेली कागदपत्रे व प्रमाणपत्रे दिली. त्यावेळी त्यांनी सदरची कागदपत्रे बिलांना लावली.  त्यावेळी मी त्यांना सदरची बिले मंजूर करण्याची विनंती केली असता श्री कुलकर्णी यांनी आवष्यक स्थानिक बिले व आक्सीजन बिले मंजूर करण्यासाठी रूपये 2000/- लाचेची मागणी केली. माझेत व श्री कुलकर्णी यांचेत चर्चा झालेवर मी व पंच श्री कांबळे असे माझे स्कूटर वरून पुन्हा जयसिंगराव तलाव, कागल येथे श्री.बुधवंत साहेब व त्यांचा स्टाफ थांबलेल्या ठिकाणी परत आलो. त्यावेळी श्री.बुधवंत सो यांनी माझेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर  17.47 वा. बंद करुन ताब्यात घेतला. त्यानंतर श्री.बुधवंत साहेबांनी मला गाडीतुन बाहेर थांबणेस सांगुन पहिल्यांदा पंच कांबळे यांचेशी चर्चा केली. त्यानंतर मला परत गाडीमध्ये बोलवुन त्यांनी माझेकडे घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असता, मी त्यांना वरीलप्रमाणे हकीकत सांगुन आवष्यक स्थानिक बिले व ऑक्सीजन बिले मंजूर करण्यासाठी श्री कुलकर्णी यांनी माझेकडे 2,000/- रू. लाचेची मागणी करुन पैसे घेवून येणेस सांगितले असल्याचे सांगितले. त्यानंतर बुधवंत साहेबांनी डिजिटल रेकॉर्डरमधील माझे आणि उप कोशागर अधिकारी कागल कार्यालयातील श्री कुलकर्णी यांचेतील लाच मागणी संदर्भातील ध्वनीमुद्रीत संभाषण ऐकले. सदर ऐकले संभाशणावरुन व पंच श्री.कांबळे आणि माझे सांगणेवरुन श्री कुलकर्णी यांनी आवष्यक स्थानिक बिले व ऑक्सीजन बिले मंजूर करण्यासाठी 2,000/- रू. लाच रक्कम मागणी करून पैसे घेवून येणेस सांगितलेचे निश्पन्न झाले.त्यामुळे श्री.बुधवंत साहेबांनी मला व पंचांना सापळा पुर्व पंचनामा सुरु करीत असलेचे सांगितले. त्यावेळी मला बुधवंत साहेबांनी उप कोशागर अधिकारी, कागल कार्यालयातील श्री कुलकर्णी यांना देणेसाठीची लाच रक्कम हजर करणेस सांगितले. त्यावेळी मी माझेकडे उपलब्ध असलेले 500/- रु. दराच्या 04 नोटा मिळून रु. 2,000/- लाच म्हणून देणेसाठी हजर केले. तेव्हा त्यांचेकडील स्टाफ श्री पाटील यांनी नोटांचे नंबर्स लिहून घेतले. त्यानंतर बुधवंतसाहेबानी मला आणि पंचांना अॅन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे महत्व सांगुन गुणधर्म सांगितले. त्यानंतर मी हजर केलेल्या नोटांना षासकीय टाटा सुमो गाडीचे मधील सिटवर पांढरा कागद अंथरुन त्यावर लाच रक्कमेतील नोटा ठेवून पोना पाटील यांनी अन्थ्रासिन पावडर लावून घेतली व गाडीमध्ये काळे कापडाचे साहायाने अंधार करुन नोटांची अल्ट्राव्हायोलेट बटरीचे सहायाने मला व पंचांना तपासणी करुन दाखविली. त्यानंतर पाटील यांनी ती लाच रक्कम रु. 2,000/- माझे शर्टचे डाव्या बाजुचे खिषात घडी करून ठेवली. त्यानंतर बुधवंत साहेबांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील वापरले मेमरी कार्ड काढुन सुरक्षित आपले जवळ ठेवले व रेकॉर्डरमध्ये नवीन सनडिस्क कंपनीचे 8 जीबीचे मायक्रो एसडी कार्ड घालून त्यामध्ये पुर्वीचे कोणत्याही प्रकारचे संभाशण ध्वनिमुद्रीत नसल्याची खात्री करुन देवुन मला, दोन्ही पंच व सापळा पथकातील कर्मचार्यांना सापळ्याचे अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या.त्यानंतर बुधवंत साहेबांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 18.00 चालु करुन तो माझे गळयात षर्टचे मागील बाजूस अडकविला. तेथून मला व पंच कांबळे यांना उप कोशागर अधिकारी श्री कुलकर्णी यांची भेट घेण्यासाठी उप कोशागर कार्यालय, कागलकडे पाठविले व बुधवंत साहेब व त्यांचा स्टाफ आणि पंच नं. 2 श्री  दिक्षीत असे त्यांचेकडील शासकीय वाहनाने आमचे पाठोपाठ आले होते. मध्यवर्ती प्रषासकीय इमारत, कागलचे आवारात मी स्कूटर लावुन उप कोशागर कार्यालयात जावुन श्री कुलकर्णी यांची भेट घेतली असता, श्री कुलकर्णी यांचेत बिलाबाबत चर्चा करून मी माझे शर्टचे खिषातील लाच रक्कम 2,000/- रू. श्री कुलकर्णी यांचेसमोर धरले असता, त्यांनी ती आपले उजवे हाताने स्विकारुन त्यंाचे पंटचे समोरील उजवे खिषात ठेवली. त्यानंतर मी कार्यालयाचे बाहेर येवुन श्री कुलकर्णी यांनी लाच रक्कम स्विकारलेबाबत मी माझे डोळयावर लावलेला चश्मा काढून पुर्वनियोजित इशारा केला. तेव्हा बुधवंत साहेब व त्यांचे सोबतचा स्टाफ यांनी उप कोशागर कार्यालयामध्ये जावून उप कोशागर अधिकारी श्री कुलकर्णी यांना पकडले. त्यांचेकडून पंच साक्षीदार यांचेसमक्ष बुधवंत साहेब यांनी लाच रक्कम रु.2,000/- जप्त केली आहे. सदर कारवाईमध्ये उप कोशागर कार्यालय, कागल मधील उप कोशागर अधिकारी श्री कुलकर्णी यांनी आवष्यक स्थानिक औशध खरेदी बिले व ऑक्सीजन बिले मंजूर करण्यासाठी माझेकडे 2,000/- रू. लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम स्विकारल्यानंतर त्यांना अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कडील पथकाने रंगेहाथ पकडले आहे. म्हणून श्री मिलींद मधुकर कुलकर्णी, उप कोशागार अधिकारी, वर्ग-2, उप कोशागार कार्यालय, कागल यांचेविरूध्द माझी फिर्याद आहे.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**

(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Dattatray Ganpat Nale(I (Inspector)) / POBN67360 or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.): to take up the **Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अमलदार
कागल पोलीस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): Dattatray Ganpat Nale
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN67360